


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १९ जानेवारी २०२५ | अंक४१ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# अजितदादांच्या पालकमंत्र्यांच्या एन्ट्रीने बीडमध्ये साफसफाई होणार ?

## धनंजय मुंडे यांचे दोर कापले

मंत्रिमंडळ विस्तार आणि मंत्र्यांच्या खाते वाटपानंतर नव्या पालकमंत्र्यांच्या नावाची कधी घोषणा होणार याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. अखरे पालकमंत्रिपदाची यादी जाहीर करण्यात आली आहे. मंत्री धनंजय मुंडे यांना मोठा धक्का बसला आहे. धनंजय मुंडे यांचं नाव पालकमंत्रिपदाच्या यादीतून वगळण्यात आलं आहे. गेल्यावेळी धनंजय मुंडे यांच्याकडे बीडचं पालकमंत्रिपद होतं मात्र यावेळी त्यांना पालकमंत्रिपद मिळालं नसून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पालकमंत्री म्हणून बीडची सूत्रं आपल्या हातात घेतली आहेत. तर मंत्री पंकजा मुंडे यांना जालन्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे.धनंजय मुंडेंना धक्का मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली, या घटनेनं बीडसह राज्यभरात खळबळ उडाली आहे. महाराष्ट्रात वातावरण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची देखील मागणी होत आहे. हाच मुद्दा पकडून विरोधकांकडून सरकारच्या कोंडीचे प्रयत्न सुरू आहेत. नैतिकतेच्या आधारावर धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांकडून होत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांना पुन्हा एकदा बीडचं पालकमंत्रिपद मिळणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. तसेच बीडचे नवे पालकमंत्री कोण असणार याबाबत देखील मोठी उत्सुकता होती.अखेर पालकमंत्रिपदाची यादी जाहीर करण्यात आली आहे, या यादीमध्ये धनंजय मुंडे यांचं नावच नाहीये, म्हणजेच त्यांना बीडच नाही तर कोणत्याही जिल्ह्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलेलं नाहीये. तर दुसरीकडे बीडचं पालकमंत्रिपद हे पंकजा मुंडे यांना न देता ते अजित पवार यांनी स्वतःकडे ठेवलं आहे. पकंजा मुंडे यांना जालन्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे. अजित पवार यांनी बीडचं पालकमंत्रिपद घ्याव अशी मागणी देखील करण्यात येत होती, अखेर आता अजित पवार बीडचे नवे पालकमंत्री झाले आहेत. त्यामुळे आता बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध कामांना





### सद्यस्थितीत मला कोणतेही:

बीड जिल्ह्यातील सध्या बदललेली राजकीय व सामाजिक स्थिती पाहता मुख्यमंत्री महोदय आणि उपमुख्यमंत्री महोदय यांना मी स्वतः बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद अजितदादांनी स्वीकारण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार दादांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारले, याचा मला आनंद वाटतो. सद्यस्थितीत मला कोणत्याच जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी नको, अशी माझी विनंतीही मान्य केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच एकनाथ शिंदे यांचे आभार! मला दिलेल्या विभागाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहील, असंही धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे.बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय ना. अजितदादा पवार यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन व खूप खूप स्वागत. आदरणीय दादांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्याच्या विकासाला पुणे जिल्ह्याप्रमाणे अधिकची गती आणि चालना मिळेल असा मला विश्वास आहे.

## पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी या शाळेचा इंटरमिजिएट आणि एलिमेंट्री परीक्षेचा निकाल १००%



आदर्श शिक्षण संस्था संचलित, पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी या शाळेतील इलेमेंटरी आणि इंटरमिजिएट या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे आदर्श मुख्याध्यापक श्री जगताप प्रदीप सर यांनी अभिनंदन केले एलिमेंट्री परीक्षेत एकूण ३५ विद्यार्थी आणि इंटरमिजिएट परीक्षेत ३९ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाळेचा १००% निकाल लागल्यामुळे चित्रकला विभागाचे प्रमुख श्री शेवंते सर यांचे अभिनंदन करण्यात आले याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक श्री ढगे सर, श्री येवले सर, श्री चौधरी सर, श्री गाडेकर सर, श्री देशमाने सर, श्री भरणे सर, श्री खटाणे सर, श्री नाईकवाडे सर, श्री कोळेकर सर, श्री जाधव, सर, शेवंते सर, श्री वाघमारे सर, श्री कलढोणे मामा, श्री बाळासाहेब देशमाने, श्री दत्ता साळवे व परीक्षार्थी विद्यार्थी उपस्थित होते.

## वाहिरा गावात हाणामारीत दोन सख्या भावांची हत्या, एक गंभीर जखमी

आष्टी । आष्टी तालुक्यातील वाहिरा येथे गुरुवारी रात्री दहाच्या दरम्यान जुन्या वादातून तीन सख्वा भावांवर त्याच्याच समाजातील काही लोकांनी लोंखडी रॉड, धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात दोन सख्वा भावांचा जागीच मृत्यु झाला. तर अन्य एक भाऊ गंभीर जखमी झाल्याची घटना अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत घडली. अजय विलास भोसले, भरत विलास भोसले असे मयताचे नावे असून कृष्णा विलास भोसले हा गंभीर जखमी झाला आहे. तिघे राहणार हतोळण ता.आष्टी येथील आहेत. अधिक माहिती अशी कि,आष्टी तालुक्यातील हातोळण येथील अजय विलास भोसले, भरत विलास भोसले, कृष्णा विलास भोसले हे तिघे भाऊ वाहिरा येथे गुरूवार (दि.१६) रोजी आले होते. याच ठिकाणी वाहिरा गावातील व बाहेरील काही लोक जमा झाले होते. गुरूवारी दुपारपासून हे सगळे याच ठिकाणी होते. रात्री साडे नऊ ते दहाच्या दरम्यान यातील काही लोकांनी या तीनही भावांवर लोंखडी रॉड, धारदार शस्त्राने हल्ला चढवला. या हल्ल्यात अजय विलास भोसले, भरत विलास भोसले या दोन सख्वा भावांचा जागीच मृत्यू झाला. तर तिसरा भाऊ कृष्णा विलास भोसले हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अहिल्यानगर येथे उपचार सुरू आहेत. या घटनतेली सात संशयित आरोपीना अंभोरा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हा खून जुन्या वादातून झाल्याचे समजते.दोनही मृतदेह आष्टी ग्रामीण रूग्णालयात ठेवण्यात आले.घटनास्थळी अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे, बाबासाहेब गर्जे, मनोजकुमार खंडागळे, भरत माने, बाबुराव तांदळे, लुईस पवार, दत्तात्रय टकले, पोलीस अंमलदार शिवदास केदार, सतीश पैठणे अमोल शिरसाठ यांनी भेट देत मोठ्या शिताफिने सात संशयित आरोपीना पोलिसांनी ताब्यात घेतले.

## शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्तीसाठी खेळाचे महत्त्व अनन्य साधारण आहे : जिल्हाधिकारी अविनाश पाठक





बीड । येथे जिल्हा क्रीडा संकुलात महसूल विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हाधिकारी शुक्रवारी (दिनांक १७ रोजी) बोलत होते. महसूल विभागामार्फत विभागीय स्तरावर जालना येथे १६, १७ व १८ फेब्रुवारी रोजी स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे . या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाडूंची निवड व्हावी, खेळाडूंचा परिचय व्हावा या उद्देशाने जिल्हास्तरीय महसूल क्रीडा स्पर्धा दिनांक १७ व १८ जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आहेत . यावेळी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , अंबाजोगाईचे अपर जिल्हाधिकारी अरविंद लाटकर, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, उपजिल्हाधिकारी ओंकार देशमुख, अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी दीपक वांजळे , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव, आष्टी पाटोद्याच्या उपविभागीय अधिकारी सीमा शेख यांच्यासह तहसीलदार चंद्रकांत शेळके, नरेंद्र कुलकर्णी, अविनाश शिंगटे, संदीप खोमणे, संतोष रुईकर , दत्ता निलावाड, राकेश गिड्डे, वैशाली पाटील, विलास तरंगे , सुरेश घोळवे , वैभव महिंद्रकर यांच्यासह त्यांचे अधिनस्त नायब तहसीलदार, अव्वल कारकून, महसूल सहाय्यक, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी , ग्राम महसूल सेवक यांच्यासह वाहन चालक, शिपाई इत्यादी उपस्थित होते. सर्वप्रथम दिपप्रज्वलन झाले. त्यांनतर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वजण अनेक क्रीडा प्रकारांची तयारी करत आहोत , आणि विभागीय स्तरावर आपल्या जिल्ह्याला निश्चितच प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे , असे आवाहन केले . खेळाडूंसाठी जिल्हास्तरावरच राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे खेळाडूंनी पूर्ण क्षमतेने सराव करावा आणि जिल्ह्यासाठी जास्तीत जास्त योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले . अध्यक्षीय भाषणात बोलताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी घोषित केले की औपचारिक रित्या स्पर्धांचे उद्घाटन झालेले आहे . सर्व क्रीडा प्रकारांमध्ये अधिकारी, कर्मचारी यांनी हिरीरीने भाग घ्यावा, सराव करावा, संस्कृतिक स्पर्धेत भाग घेतलेल्यांनी आपल्या जिल्ह्याचे नाव पुढे कसे येईल यासाठी पुरेपूर प्रयत्न करावेत असे नमूद केले.

# पीएम किसान योजनेत मोठा बदल; घरातील या सदस्यांचा पत्ता कट,

## बनवाबनवी करणारे रडारवर, नवीन नियमावली वाचली का?

पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेत मोठा बदल (PM Kisan Yojana Big Changes) झाला आहे. या योजनेतील बनवाबनवी करणारे रडारवर आले आहेत. नवीन नियमानुसार, घरातील या सदस्यांचा पत्ता लाभर्थ्यांच्या यादीतून गायब होणार आहेत. शेतर्कयांना सध्या १९ व्या हप्त्याची प्रतिक्षा आहे. हा हप्ता या महिन्याच्या अखेरीस मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यापूर्वीच ही मोठी अपडेट समोर आली आहे. नियमात मोठा बदल झाल्याचे समोर येत आहे. घरात एकालाच मिळणार लाभ यापुढे पीएम किसान योजनेचा लाभ कुटुंबातील केवळ एकाच व्यक्तीला देण्यात येणार आहे. त्यासाठी केवायसीची मदत घेण्यात येईल. पडताळणीत एकाच घरातील इतर सदस्यांना लाभ मिळाल्याचे आढळल्यास त्यांना दणका देण्यात येईल.




कुटुंबातील इतर सदस्यांचा पत्ता कट होईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी २०१९ पूर्वी जमीन खरेदी करणा-यांना मिळणार आहे. केंद्र सरकारची नवी नियमावली पीएम किसान योजनेतंर्गत एकाच कुटुंबातील पती, पत्नी, मुलगा, मुलगी लाभ घेत असतील तर एकालाच लाभ घेता येईल. इतर सदस्यांचा पत्ता कट करण्यात येणार आहे. पीएम किसान योजनेबाबत केंद्र सरकारची नवीन नियमावली आली आहे. यामध्ये अनेक बदल झाल्याचे दिसून आले. १. सर्वात मोठा बदल म्हणजे कुटुंबातील एकाच व्यक्तीला झच घळीरप धेक्षरपर चा लाभ घेता येईल. २.आयकर भरणारा नोकरदार, अल्पभूधारक यांना लाभ नाही ३.अर्जाची छाननी प्रशासन हाती घेणार आहे ४.एकाच कुटुंबातील अधिक व्यक्ती लाभ घेत असल्याचे लक्षात आले तर इतरांचा पत्ता कट होईल ई-केवायसीशिवाय हप्ता जमा होणार नाही सरकारच्या गाईडलाईन्सचे योग्य पालन केले नाही तर १९ वा हप्ता खात्यात जमा होणार नाही. पीएम किसान योजनेतील लाभार्थी शेतर्कयांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. नियमानुसार ई-केवायसी करणे अनिवार्य आहे. त्यासाठी पीएम किसान योजनेच्या अधिकृत ग्झिळीरप.सेीं.ळप या संकेतस्थळावर जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करता येईल. वर्षाला ६ हजारांची आर्थिक केंद्र सरकार दरवर्षी ६ हजारांची आर्थिक मदत शेतर्कयांना देते. ही रक्कम पीएम किसान सन्मान निधी योजनेतंर्गत उइढ, थेट लाभार्थी शेतर्कयांच्या खात्यात जमा करण्यात येते. शेतर्कयांच्या खात्यात दर चार महिन्याला ३ हप्त्यात दोन हजार रुपये जमा करण्यात येतात. सध्या या योजनेत एकूण १८ हप्ते जमा करण्यात आले आहे.

## संपादकीय

### खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यास मदत करतील ही स्वस्त फळे

खराब कोलेस्ट्रॉलला कोलो-डेन्सिटी लिपोप्रोटीन ( एलडीएल ) देखील म्हणतात. तुमच्या शरीरात एक प्रकारचे कोलेस्टेरॉल असते, जे रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊ शकते. त्यामुळे रक्तवाहिन्या ब्लॉक होऊन हृदयविकार वाढण्याचा धोका सर्वाधिक निर्माण होतो. खराब कोलेस्ट्रॉल यकृतात तयार होते आणि नंतर रक्तात विरघळण्यासाठी लिपोप्रोटीनशी बांधले जाते. न्यूट्रिशनिस्ट नमामि अग्रवाल सांगतात की, जर शरीरात बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी वाढली तर ते रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊन प्लेग तयार करते, ज्याला एथेरोस्क्लेरोसिस म्हणतात. हे प्लेग रक्त प्रवाह कमी करू शकते, ज्यामुळे हार्ट स्ट्रोक आणि हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. शरीरातील वाढलेले कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी काही स्वस्त फळांचा आहारात समावेश करता येऊ शकतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. यासाठी तुम्ही देखील तुमच्या आहारात या फळांचा समावेश करा आणि तुमच्या हृदयाचे आरोग्य चांगले ठेवा. सफरचंदाचे सेवन करा खराब कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यासाठी सफरचंद अतिशय प्रभावी फळ आहे. सफरचंदात विरघळणारे फायबर आणि पेक्टिन असते, जे कोलेस्टेरॉलला रक्तातून बाहेर काढण्यास मदत करते. दररोज एक सफरचंद खाल्ल्याने कोलेस्टेरॉलची पातळी योग्य राहते. अननसाचे सेवन करा अननसामध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. अननसामध्ये ब्रोमेलेन नावाचे एंजाइम असते. यामुळे नसांमध्ये अडकलेले खराब कोलेस्टेरॉल बाहेर काढण्यास मदत होते. यासोबतच शरीराच्या आतील भागाचीही स्वच्छता करते. ज्यामुळे तुमच्या हृदयाचे आरोग्य चांगले राहते. संत्रे आणि लिंबू सेवन करा कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी व्हिटॅमिन सी खूप फायदेशीर मानले जाते. त्यामुळे संत्रा, लिंबू, आणि हंगामी फळांचा आहारात समावेश अवश्य करावा. दररोज एक संत्री किंवा हंगामी फळे खाल्ल्याने कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहते. द्राक्षाचे सेवन करा द्राक्षांमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि फायबर असतात, जे कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करतात. यात रेझवेराट्रॉल नावाचा घटक असतो, जो हृदयाच्या आरोग्यासाठी चांगला असतो. नियमित द्राक्षे खाल्ल्याने कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहते. खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी तुमच्या आहारात हेल्दी डाएटचा समावेश करा. बाहेर तळलेले आणि मसालेदार पदार्थांपासून दूर राहा. यासोबतच दररोज व्यायाम करा. ( डिस्क्लेमर : या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. आमचा याला दुजोरा नाही. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)



# शिवक्रांतीची मशाल हाती घेवुन न्यायमागण्यासाठी लढणारे कणखर नेतृत्व दादासाहेब बजगुडे पाटील

बीडच्या मातीत जन्मलेल्या अनेक कर्तत्वान युवकांनी जिल्ह्यासह राज्यभरात आणि देशात आपल्या कर्तत्वाचा डंका पेटवलेला आपण नेहमीच पाहतोय. त्यापैकीच मराठा आरक्षण किंवा मराठा चळवळीत कायम अग्रभागी असलेल व्यक्तिमत्त्व शिवक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेस पक्षाचे नेते मा. दादासाहेब (गणेश) बजगुडे पाटील यांचा आज ४० वा वाढदिवस .. सर्व प्रथम त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा..₹: १८ जानेवारी १९८५ रोजी बीड शहरातील पेठबीड भागात सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेले हे नेतृत्व पुढे पुर्ण वेळ सामाजिक आणि राजकीय कार्यात सक्रिय होईल असे कोणालाही वाटत नव्हते. कारण घरामध्ये दुरदुर पर्यंत कोणीही राजकारण समाजकारणात नव्हते, वडील आसाराम दिगंबरराव बजगुडे व आजोबा दिगंबर गणपतराव बजगुडे हे त्याकाळी बीड येथील प्रसिद्ध आडत व्यापारी घरची परिस्थिती बऱ्यापैकी जेमतेम अभ्यासात अतिशय हुशार असल्यामुळे आपल्या मुलाने सरकारी नोकरी करुन समाधानी जीवन जगावे असे आई वडिलांना कुटुंबीयांना वाटायचे परंतु लहानपणापासूनच नेतृत्वगुण असलेल्या दादांनी पहिली ते दहावी वर्गाचा मॉनिटर, पुढे महाविद्यालयीन जीवनात देखील विद्यार्थी सचिव म्हणून काम करत आपल्या राजकीय व सामाजिक कार्याचा श्रीगणेशा वयाच्या १७/१८ व्य वर्षी करत पुढे अ. भा. मराठा महासंघ शहराध्यक्ष, छावा संघटनेचा जिल्हाध्यक्ष, मराठा आरक्षण विद्यार्थी कृती समिती अध्यक्ष अश्या वेगवेगळ्या पदावर काम करत असताना वयाच्या २६ व्या वर्षी शिवक्रांती युवा परिषद या सामाजिक संघटनेची स्थापना करत पुर्णवेळ समाज कार्य करण्याचा निर्णय घेतला. मराठा आरक्षणाची लढाई असो किंवा बीड जिल्हा रेल्वे आंदोलनातील प्रमुख चेहरा म्हणून जिल्ह्यात गणेश दादा बजगुडे पाटील यांच्याकडे पहितले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून शिवरायांच्या विचारांची क्रांती म्हणजेच शिवक्रांती युवा परिषद नावाने स्वतःची नोंदणीकृत संघटना स्थापन करून बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि महाराष्ट्रभर शिवक्रांतीच्या सुर्यांकित झेंड्याखाली हजारो तरुणांना संघटित करत गाव खेड्यातील तरुणांना आधार व पाठबळ देण्याचे काम गणेश दादा बजगुदे पाटील यांनी केलेले आहे. आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या अडचणीचे निराकरण करून त्यांच्या मदतीला धावुन जाणे, कसल्याही परिणामाची चिंता नकरता कार्यकर्त्याला सर्वतोपरी पाठबळ देणे व त्यांच्या सुख दुःखात कुटुंब प्रमुखाप्रमाणे पाठीशी राहणारे हे नेतृत्व असुन अतिशय निर्भिड, आक्रमक व परिणामाची चिंता नकरणारे व्यक्तिमत्व म्हणुन दादासाहेब बजगुडे पाटील यांची ख्याती आहे. बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगर, जालना, धाराशिव , परभणी, लातुर, नांदेड इत्याडीसह नाशिक, पुणे, अहिल्यानगर, मुंबई, सोलापूर इत्यादी जिल्ह्यात देखील शिवक्रांतीच्या माध्यमातून तरुणांची स्वतंत्र फौज निर्माण करत फक आंदोलने व शाखा उद्धटनेच नाही तर सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यात देखील ते नेहमीच अग्रेसर असतात रुग्णवाहिका, आरोग्य शिबीर, पाणपोई, अन्नदान, धान्य व किराणा वाटप, रक्तदान शिबिर, विद्यार्थी करियर मार्गदर्शन शिबिर, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, हस्तकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, क्रीडा स्पर्धा यासह वेगवेगळे व्याख्यान, पोवाडे, मार्गदर्शन शिबिर इत्यादी सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक कार्य ते नेहमी आपल्या शिवक्रांती युवा परिषदेच्या माध्यमातून घेत असतात. बीड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालण्यासाठी हायड्रॉलिक सिडी बसवण्यात यावी यासाठी बीड नगर पालिकेला शिवक्रांतीच्या वतीने ठोकलेले कुलूप असेल किंवा मराठा आरक्षणासाठी बीएसएनएल टॉवरवर चढून भल्या पहाटे केलेले शोले स्टाईल आंदोलन, रस्ता रोको, विद्यार्थ्यांच्या फिसवाढच्या निषेधार्थ कॉलेज प्रशासनाच्या विरोधात केलेले भिक मांगो आंदोलन यासह शेतकरी, कामगार, रिक्षा युनियन यांच्यासाठी केलेले विविध लक्षवेधी आंदोलने आज देखील बीडकराणा ज्ञात आहेत. एकेकाळी आंदोलन म्हणाले की गणेश बजगुडे असे समीकरणच जिल्ह्यात निर्माण झाले होते. कुठल्याही प्रस्थापितांना नजुमनाता कुठल्याही दबावाला व अमिषाला बळी नपडता अतिशय आक्रमक पवित्रा घेत २४ तास लोकांच्या सेवेत आलेले हे नेतृत्व लोकप्रिय सर्वपरिचित व प्रचंड जनसंपर्क असल्यामुळे यानेतृत्वला अडचणीत आणण्यासाठी प्रस्थापितांनी षडयंत्र रचण्याचे काम ही केले होते परंतु अडथळ्यांना भिऊन थांबेल ते दादासाहेब बजगुडे पाटील कसले त्यांनी कोणाच्याही कसल्याही षडयंत्रला भिक न घालता आपल्या कार्यात तीळभर ही खंड पडू दिला नाही. पुढें सामाजिक चळवळीला राजकीय बळ असावे असे सर्व सहकाऱ्यांच्या इच्छेमुळे त्यांनी दी. २४ ऑक्टोबर २०२१ रोजी बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्याच्या लोकप्रिय नेत्या राज्यसभा खासदार रजनीताई अशोकराव पाटील व प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांच्या नेतृत्वात काँग्रेस प्रवेश केला. त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीमुळे पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर बीडच्या तालुका प्रमुख पदाची जबाबदारी देवुन त्यांचा सन्मान ही केला. आज गणेश (दादासाहेब) बजगुडे पाटील यांच्या नेतृत्वात बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणत काम करत असुन त्यांची काम करण्याची पद्धत, प्रचंड जनसंपर्क, लोकांशी असलेले कौटुंबिक नाते, सामाजिक बांधिलकी, वक्तृत्व, कर्तुत्व व दातृत्वाचा त्रिवेणी संगम, प्रचंड इचछाशक्ती, आत्मविश्वास आणि प्रस्थापितांनी लाजवेल अशी शरीरयष्टी असलेले हे नेतृत्व भविष्यकाळात राज्याच्या राजकारणातील मोठे नेतृत्व असेल.. दादासाहेब आपल्या जीवनात येणाऱ्या प्रत्येक संकटमयी वदळास हसत हसत पायदळी तुडवून आपण पेटवलेली शिवक्रांतीची मशाल कायम तेवत राहावी व आपणास निरोगी दीर्घायुष्य लाभो हीच आई जिजाऊ व छत्रपती शिवरायांचरणी प्रार्थना.. आपणास जन्मदिनाच्या मनःपुर्वक शुभेच्छा

# रात्री शांत झोप येत नाही का?

आज-काल धावपळीच्या युगात रात्री शांत झोप न येणे ही एक कॉमन समस्या झालेली आहे का? रात्री शांत झोप येणे ही सर्व वयोगटातील समस्या आहे का? ज्या व्यक्तीला रात्र रात्र झोप येत नाही झोप येण्यासाठी तो तडफडत असतो झोप येत नाही. म्हणून कासावीस होऊन अस्वस्थ होत असतो. अनिद्रांचे परिणाम व्यक्तीच्या शरीर मनावर पडत असतात. याला झोपेचे महत्त्व काय आहे हे समजत असते. रोज व्यक्तीला सहा ते आठ तासाची झोप घेणे आवश्यक असते हे आपल्याला माहीतच आहे परंतु दिवसभराच्या कामाच्या दगदगीनंतर अनेकांना रात्री लवकर झोप येत नाही रात्री व्यवस्थित झोप आली नाही तर दिवसभर फ्रेश वाटत नाही. मग शांत झोप न झाल्यावर थकवा येतो कोणत्याही कामात उत्साह जाणवत नाही असे आपल्या सोबत होत आहे का? मग झोप कोणात्या व्यक्तीला येत नाही ज्या व्यक्तीला धोका,काळजी, भीती, त्रास, इर्शा,द्वेष, दुःख, टेन्शन, भावनिकता, एकटेपणा आणि अस्वस्थ मानसिकतेत जीवन जगत असतात त्यांना झोप येत नाही का? मग शांत झोप येत नाही म्हणून खाली काही कामे करतो का? १.अनेक चुकीच्या कृती पुन्हा पुन्हा केल्या जातात का? २. झोप येत नाही म्हणून मोबाईलवर टाईमपास केला जातो का? ३. मोबाईलवर टाईमपास होतो म्हणून पुन्हा झोप मोड होते का? ४. झोप येत नाही तेव्हा जास्तच नकारात्मक वेदनादायी व अस्वस्थ , बेचैन करणारे त्याचबरोबर आत्महत्या सारखे विचार जास्त येतात का? ५.झोप न झाल्यामुळे आपल्या शारीरिक आणि मानसिकतेवर क्षमतेवर,आरोग्यावर, भविष्यातील योजनेवर, कामाच्या दर्जावर परिणाम पडतो का? ६.झोप न झाल्यामुळे शारीरिक व मानसिक थकवा अधिक जाणवतो का? ७. रात्री कौटुंबिक विसंवाद चिडचिड झाल्यास अति भीती काळजी, टेन्शन, दुःख ,त्रास ,चिडचिड, एकटेपणा, असुरक्षितता ,प्रेमाचा अभाव अशा भावना झोपण्यापूर्वी सतत मनात निर्माण होत असतील तर झोप व्यवस्थित होईल का? ८. नकारात्मक विचार अपेक्षा व भावना यांची घुसमट होत आहे का? याचा परिणाम आपल्या झोपेवर पडतो का? ९. भूतकाळात नको असलेल्या घटना पुन्हा पुन्हा डोळ्यासमोर येतात का यामुळे झोप शांत होत नाही का? १०.भूतकाळात जे झाले ते पुन्हा येऊ शकत नाही हे माहीत असून सुद्धा ते विसरत नाही का? निसर्गचक्रानुसार अंधार पडला की तीन तासात गरजे इतका झोपेचा हार्मोन्स स्त्रावत असतो त्यामुळे झोप येत असते. विचार, आहार,व्यायाम आणि झोप प्रत्येक व्यक्तीला खूप गरजेची आहे. या सिक्वेन्स मध्ये कमी जास्त प्रमाणामध्ये बदल झाला की मेंदूमध्ये काही संप्रेरक कमी जास्त प्रमाणामध्ये स्त्रावतात त्यामुळे नको असलेल्या घटना समस्या आपल्याला उद्भवत असतात. मग तुमच्या जीवनामध्ये सुद्धा असं काही होत असेल तर खालील दिलेल्या नंबर वर कॉल करा वेळेवर त्याचे निराकरण केलं नाही तर निद्रानाश व बरच काही होऊन आपल्याला मानसिक गंभीर आजार होऊ शकतात आणि शारीरिक आजाराला तोंड फुटते म्हणून आपण वेळीच यावर उपाय केला पाहिजे.

# युवा विचार.

जागतिक युवा दिनानिमित्त स्वामी विवेकानंदांचे स्मरण होते.त्यांनी युवांसाठी मांडलेले विचार अविकल्प आहेत. देशातील युवाशक्तीला बलशाली व सामर्थ्यशाली बनविण्यासाठी युवा विचार युवांसाठी संजीवनी आहेत.

उद्दिष्टत जागृत प्राप्य वरांनी बोधत

या ओळींमधून लक्ष प्राप्त करण्यासाठी स्वामींनी युवांना संदेश दिलेले आहेत. त्याचा अर्थ असा की,

उठा ! जागे व्हा!! आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका!!!उठा धीट बना, सर्व शक्ती संपन्न बना,तुम्ही सगळी जबाबदारी स्वतःच्या शिरावर घ्या. आणि जाणीव असू द्या की, तुम्हीच तुमच्या भाग्याचे निर्माते आहात. ध्येय नसेल तर जीवनात केलेली वाटचाल ही निरर्थक आहे.

देशाचा प्रत्येक युवा हा खंबीर असावा,संकटांना सामोरे जाणारा असावा, धैर्यवान असावा. त्याचे स्नायू हे लोखंडी बळकट असावेत. त्याचे मज्जातंतूही पोलादी असावेत. त्याचे मन हे वज्राचे असावे. अन त्यातच त्याला पुरुषार्थ प्राप्त होणार आहे. क्षत्र म्हणजेच शासक, तेजस्वी,संस्कृत तरुणांची देशाला गरज आहे.

स्वामीजींनी भारतभूमीवरील सर्व धर्माला उद्देशून आपले विचार मांडलेत. त्यासाठी सर्व धर्म समन्वय साधला जायला हवा. पवित्र्याच्या तेजाने ईश्वरावरील श्रद्धेचे भूकवच ल्यालेले म्हणजेच परिधान केलेले मुगेंद्राचे सामर्थ्य नसानसांत स्फुरत असलेल्या दिनदलितांबद्दल सुद्धा हृदयात करुणा असायला हवी. देशासाठी प्रकर्षाने झटणारे युवक युवती हिमाचलयापासून तर कन्याकुमारी पर्यंत सर्वत्र देशात संचार करतील आणि संचार करणारे हे युवा स्वतःमध्ये मुक्ती,सेवा,सामाजिक उत्थान अशा प्रकारचे समाजाला आवाहन करण्यासाठी प्रयत्नशील असतील. असे स्वप्नही स्वामीजींनी देश सेवा करणा-या युवांप्रति मांडलेले आहेत. असे घडल्यास आपला देशही प्रकाशाने मुसमुसून निघेल.

मनुष्य दृष्टिकोन,दूरदृष्टी विषयी स्वामीजी सांगतात की, सभोवताली बघितल्यावर जगाचे पाप, दृष्टपणा विषयी समाज बोट दाखवते; जगात पाप असूनही त्या पापावर बोट न ठेवता मनुष्य जाणीवपूर्वक त्या पापाचा भागीदार होतो जर मनुष्याला जगाचे पाप व दुबळेपणा दिसत असेल तर त्यामध्ये बदल करण्यासाठी स्वतः बदल घडवून प्रयत्नशील बनावे असे स्वामीजींचे विचार होते.

स्वामीजींनी भारत मातेला स्मरून त्यावर चिंतन केले.आपल्या भारतातील गोरगरीब जनतेची स्थिती त्यांनी बारकाईने बघितली. त्यांच्या अशा लक्षात आली की, आपल्या देशातील अनेक लोक उपाशी आहेत. आपण त्यांना वेदांतांचे उपदेश देऊन बदल घडवणे अपेक्षित ठरवतो. अशा लोकांना दोन वेळेच्या भाकरीची भ्रांत असताना वेदांत सांगणे म्हणजेच खोटे ठरेल. म्हणून देशातील गरिबी ही मोठी समस्या आहे.. स्वामीजी ज्ञानाचे उपदेश मांडत बसण्यापेक्षा स्थिती ही समाजाला दाखविण्याचा प्रयत्न करत.

स्वामीजींनी धर्मोपदेश करत असताना सांगितले की खरा धर्म हा सूर्यासारखा सर्व प्रकाशक असतो. वसुंधरेसारखा सर्वसंग्रह असतो. सर्वधर्म समन्वय साधलाच जायला हवा.

स्वामींचे हे विचार युवांसाठी संजीवनीसम प्रेरणादायी आहेत. देशातील युवांनी स्वामींचे विचार आत्मसात केले तर देश बलशाली व सामर्थ्यशाली होण्यासाठी विलंब लागणार नाही.

सौ शुभांगी माळी
नाशिक

# नवउद्योजकांनी कामाची लाज न बाळगता मेहनत करावी : दातार

आज प्रत्येक क्षेत्राप्रमाणे व्यवसायातही तीव्र स्पर्धा आहे. व्यवसायात प्रवेश करणे सोपे असले तरी टिकून राहणे अवघड असते. व्यवसाय हा विरंगुळ्यासाठी किंवा दानधर्मासाठी करायची गोष्ट नसून त्यात नफा हे एकमेव ध्येय समोर ठेवावे लागते. त्यामुळे व्यवसायात यश मिळवायचे असेल तर नवउद्योजकांनी कामाची लाज न बाळगता मेहनत करावी आणि ङ्गमर किंवा मारफ (डाय ऑर किल) अशा निर्धारानेच पाय रोवून उभे राहावे, असा सल्ला दुबई स्थित ङ्गअदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्सफ्चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी नवउद्योजकांना दिला. ङ्गआकार डिजी ९फ न्यूज चॅनलतर्फे आयोजित आणि ङ्गट्रायझॉन कॉर्पोरेट सर्व्हिसेसफ तर्फे प्रस्तुत ङ्गदुबई बिझनेस कॉन्क्लेव्ह २०२५फ या कार्यक्रमात ते बोलत होते. दुबईतील इंडिया क्लबच्या उत्सव हॉलमध्ये हा कार्यक्रम नुकताच झाला. मराठी उद्योजकांना दुबईत व्यवसाय करण्याची संधी मिळावी व बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या हेतूने आकार ङ्गडिजी ९फ्चे संस्थापक प्रभाकर सूर्यवंशी यांनी या बिझनेस टूरचे आयोजन केले होते. दुबईतील प्रथितयश मराठी उद्योजकांशी त्यांनी या कार्यक्रमात संवाद साधला. धनंजय दातार म्हणाले, मी ४० वर्षांपूर्वी दुबईत आलो त्यावेळी जी स्पर्धा होती त्याहून अधिक प्रचंड स्पर्धा सध्या आहे. जगभरातून अनेक उद्योजक या करमुक्त बाजारपेठेचा लाभ घेण्यासाठी येथे गर्दी करत आहेत. अशावेळी आपले अस्तित्व राखायचे असेल तर दुसऱ्यावर मात करावीच लागते. व्यवसाय हा फक्त नफ्यासाठीच करायचा असतो. नफ्याचे मार्जिन कमी ठेऊनही आपण स्पर्धेत तग धरु शकतो. मात्र झटपट नफ्याच्या आशेने आलेल्यांना उतावीळपणाने काही मिळत नाही. इन्शुरन्स कन्सल्टन्सीफ्चे व्यवस्थापकीय संचालक विवेक कोल्हटकर यांनी जोखीम व्यवस्थापनाविषयी (रिस्क मॅनेजमेंट) मार्गदर्शन केले. संयुक्त अरब अमिरातीत (युएई) अनेक वर्षांपासून आरोग्यक्षेत्रात सेवा देणारे डॉ. संजय पैठणकर तसेच या कार्यक्रमाचे प्रायोजक ङ्गक्किक हीलफ्चे ओंकार शेणोलीकर आपले अनुभव सांगितले. श्र्वेता घालवाडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १९ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर येथे गायत्री महायज्ञ व (गणपती अथर्वशीर्ष) सहस्त्र आवर्तन अभिषेक



गायत्री तिर्थ शांतिकुंज हरिद्वार च्या आशीर्वादाने हिंदूधर्म व सनातन संस्कृतीच्या परंपरेनुसार व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्प्रेरणा जागविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुदायिक यज्ञाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ठ वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या प्रेरणेने दिनांक- १७/ ०१/२०२५ शुक्रवार पौष वद्य संकट चतुर्थी निमित्त गायत्री महायज्ञ व (गणपती अथर्वशीर्ष) सहस्त्र आवर्तन अभिषेक आयोजित करण्यात आला . या यज्ञाचे यजमान-सौ.व श्री तुकाराम पंत जोशी सपरिवार हे होते. आजच्या या गायत्री यज्ञाचे पुरोहित म्हणून गायत्री परिवाराचे बीड जिल्हा समन्वयक ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे होते, या कार्यक्रमात होम हवन तसेच एक गर्भसंस्कार हा कार्यक्रम देखील करण्यात आला, यावेळी यशवंत नगर मधील असंख्य माता भगिनी व भावीक भक्त उपस्थित होते, यामध्ये ॲड.मंगेश पोकळे सर अध्यक्ष श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर, मुकुंद भुतपल्ले, विलास लेंबे,हनुमानदास बियाणी, अनिल शेठ चरखा, महावीर सेठ बोरा, चंपावती पत्र चे महादेव नाना साळुंके, मेढे साहेब, म्हेत्रे काका,भराटे काका, चाटे साहेब,जाधव साहेब,मुढे सर, बाळासाहेब जायभाये, सुरेखा जाधव, पोकळे ताई, लेंबे काकू,पोकळे काकू, वृंदावणी साळुंके, डॉ.आरती भूतपल्ले , अदी भाविक भक्त उपस्थित होते. अथर्वशीर्ष आवर्तना साठी वे.शा.संपन्न नारायणदेव सुलाखे सह ११ ब्रम्हवंद हजर होत

## तालुका बांधकाम कामगार कार्यालयाचे काम संथ गतीने

बांधकाम कामगारांसह विविध कामगारांसाठी शासनाने कामगार मंडळाची स्थापना केली आहे या महामंडळा मार्फत विविध योजना राबविल्या जातात कामगारांच्या लग्नासाठी ,कामगारांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती ,प्रसूती झाल्या नंतर आर्थिक सहाय्य अश्या अनेक प्रकारे कामगारांना महामंडळा कडून लाभ मिळतो मात्र तालुका कामगार कार्यालयात आता हा सर्व कारभार पाहिला जात आहे तालुका कामगार कार्यालयात तालुक्यातील लोक आपल्या कामासाठी येतात मात्र तालुक्याच्या च्या ठिकाणी एकच कार्यालय कार्यारत असल्याने कामगारांची कामे वेळेवर होत नाही ,अपेक्षे पेक्षा जास्त वेळ खर्च होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे या पूर्वी बांधकाम कामगार महामंडळाची सर्व कामे म्हणजेच नवीन नोंदणी, शिष्यवृत्ती, यासह इतर कामे अधिकृत संकेतस्थळावर सुरू होती जेणे करून ग्राहक सुविधा केंद्र आणि सेतू सुविधा केंद्रावर ही कामे सोयीने पूर्ण होत असे मात्र गेल्या काही दिवसांपासून ही सर्व कामे तालुक्याच्या कार्यालयावर सुरू असलायेन तालुक्याचे कार्यालय या कामासाठी कमी पडत आहे असे दिसते जेणे करून कामगारांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे लहान सहन कामासाठी या ठिकाणी मोठा वेळ खर्च होतो आणि सकाळी नऊ ते दहा पर्यंतच कामे अर्ज स्वीकारले जातात त्या नंतर आलेल्या कामगारांना परत पाठविले जात असल्याने नागरिकांत प्रचंड नाराजी पसरली आहे दिवसाचे काम बुडवून सकाळी नऊ वाजता येऊन ही लवकर कामे होत नाही त्या नंतर दिवस वाया जात आहे या सह बसण्यासाठी कोणती ही आसन व्यवस्था नसल्याने नागरिकांना ताटकळत उभे राहावे लागत आहे या सह अनेक समस्यांचा सामना कामगारांना करावा लागत असल्याने कामगार वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे. कामगार महामंडळाची कामे पूर्वी प्रमाणेच संकेतस्थळावर सुरू करण्यात यावे जेणे करून तालुक्याचा ठिकाणी एकाच कार्यालयात गर्दी होणार नाही आणि कामात ही पारदर्शकता येईल आणि कामगारांना होणारा त्रास थांबेल या सह कामगारांची होणारी हेळसांड थांबवा आणि पूर्वी प्रमाणे सणाकेथळवर कामे सुरू करा अशा आशयाचे एक निवेदन आपण मां जिल्हाधिकारी साहेब यांना देखील देणार आहोत असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवा सेना उपजिल्हा प्रमुख अशफाक भाई शेख यांनी पत्रकाद्वारे केली आहे.

## राज्य परिवहन महामंडळ सातारा आयोजित विभागीय नाट्य स्पर्धा संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड :- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन म हामंडळ सातारा विभागा मार्फत आयोजित अंतर विभागीय अंतिम नाट्य स्पर्धा दि.१६ जानेवारी २०२५ रोजी नांदेड येथील कुसुम सभागृहात संपन्न झाली.

प्राध्यापक दिलीप जगताप लिखीत व विजय सूर्यवंशी दिग्दर्शक असलेल्या ङ्गएक तळ गाळातफ या दोन अंकी सामाजीक नाटकातील उत्तम व दर्जेदार सादरीकरणातून नांदेडकरांनी अनुभवले ग्रामीण भागातील खरे वास्तव्य या नाटकाचे नैषध्य नाटकास साजेशे उभारण्यात आले. सदर नाटकातील रंगमंच व्यवस्था त्यातील पात्र निवड साजेशी व नाटकातील सर्वच कलाकारांनी त्यांच्या दमदार अभिनय सादर केले तसेच नाटकाचे प्रकाश योजना व प्रार्श्वसंगीत नाटकाला साजेशे अतिशय उत्तम होते. एकंदरीत ङ्गएक तळ गाळातङ्ग हे नाटक अतिशय उत्तम व दर्जेदार सादर करण्यातम



ुळे नांदेडकरांनी मनसोक्त आनंद घेतला. या नाटकातून सामाजीक विषय उत्तम पध्दतीने मांडण्यात आल्याने नदीच्या काटावरील खेडेगांवची परिस्थिती काय असते हे समिर ननावरे व अलू दैवता यादव व त्यांची झोरु व इरु अशी दोन मुले हे दांपत्य या कुटुंबातील बिकट परिस्थिती लोकांचे शोषण, परकीय अतिक्रमण व अंधश्रद्धा काय असते हे ग्रामीण भागातील वास्तव्य समजले.

सदर नाटकाची निर्मिती विभाग नियंत्रक- रोहन पलंगे, निर्मिती कामगार अधिकारी सहाय्य- श्रीमती रेश्मा गाडेकर, विभागीय वाहतूक अधिकारी- श्रीमती ज्योती गायकवाड, चालन यंत्र अभियंता- विकास माने, उपयंत्र अभियंता- भुषण सूर्यवंशी यांनी केलेले आहे.

तसेच या नाटकाचे दिग्दर्शन- विजय सूर्यवंशी, व सुशिल कांबळे, राजू थोरात, अजित माने यांनी नाटकास साजेशे नैपथ्य केलेले आहे. रंगमंच व्यवस्था- चरण गायकवाड, महेश जाधव यांनी केली तर नाटकाची प्रकाश योजना- आनंदराव नवघणे, पार्श्वसंगित- ललिश पाटील यांनी नाटकाला साजेशे उत्तम केलेले आहे. या नाटकातील प्रमुख भुमिका माकुरी- समिर ननावरे, अलू- दैवता यादव, इरु- विजय मोरे, भिकारी- सचिन मथुरे, पुजारी- अंकुश लोहकरे, सेवक- तुषार भोसले, पंखेवाला- सुरेश गायकवाड, ढोलवाला- श्रीनिवास शेजवळ यांनी नाटकाला साजेसे उत्तम सादरीकरण केले, तसेच यावेळी पूर्व कलाकार- दत्ता धनावडे यांचीही उपस्थिती होती.

एकंदरीत ङ्गएक तळ गाळातङ्ग हे नाट्य उत्तमरीत्या सादर करण्यात आल्याबद्दल नांदेडकरांनी सातारा विभाग परिवहन म हामंडळाचे मनःपूर्वक आभार मानले.

## आठवडी बाजार गोंडराजे मैदानात भरविण्याची मागणी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : शहरातील आठवडी बाजार रविवारी गोंडराजे व्यासपीठ लगत असलेल्या रस्त्यावर भरत असून वाहनामुळे व मोकाट जनावरामुळे व्यापारी व ग्राहकाम ध्ये तारंबळउडत असून ग्राहक व व्यापा- यांना अधिक त्रास होत आहे.आठवडी बाजार हा गोंडराजे व्यासपीठ प्रांगण येथे दर रविवारी भरण्यात यावा अशी मागणी नगरपालिकेचे मा.बांधकाम सभापती शरद जयस्वाल यांनी केली आहे.सविस्तर वृत्त असे की शहरांमध्ये जाणारा राज्य म हामार्ग हा अनेकांच्या अडचणीमुळे अरुंद



होत आहे.यातच वाहनांची एकच गर्दी होत असल्यामुळे अनेक वाहने गोंडराजे मैदान मार्गे बस स्थानकाकडे वळत आहेत. त्यातच रविवारी भरणारा आठवडी बाजार हा या परिसरातील शेतकरी वर्ग स्वतः च्या शेतातील मालविक्री करण्या करता बाजारात आणत असून या व्यापा-यांना गोंडराजे व्यासपीठ पासून जाणारा बस स्थानक दोन्ही साईडचा मार्ग यावर दुकाने थाटावी लागतात . तर आज घडीला व्यापा-याची एवढी गर्दी झाली की राजेंद्र नगर येथे आमदार केराम यांच्या घरापर्यंत व गल्लीमध्येही भाजीपाल्याचे दुकान लागत असल्याचे चित्र निदर्शनास येतात .

शहरातील फिरणारे मोकाट जनावरे व अरुंद रस्त्यामुळे वाहनाची एकच गर्दी होत आहे.त्यामुळे दुसरा मार्ग म्हणजे गोंडराजे व्यासपीठ मार्ग जावे लागते.शहरातील आठवडी बाजार रविवारी रस्त्यावर होत असल्यामुळे व्यापारी व ग्राहकांमध्ये तारांबळ होत आहे.तर महिला वर्गाला भाजीपाला खरेदी करत असते वेळेस गर्दीतून खरेदी करावा लागतो.याचाही नाहक त्रास महिला वर्गांना होत आहे .तर गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरटे शहरांमध्ये रविवारी सक्रिय असल्याच्या वारंवार घटना घडत आहेत.या सर्व बाबी टाळण्यासाठी गोंडराजे व्यासपीठ प्रांगणामध्ये नगरपालिका प्रशासनाने आठवडी बाजार भरवण्याची व्यापा-यांना परवानगी द्यावी अशी मागणी नगरपालिकेचे माजी बांधकाम सभापती जयस्वाल यांनी केली आहे.

## रेणुका माता मल्टिस्टेटशाखा आष्टी येथे हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात



आष्टी ।हितगुज करूया मिळुनी साऱ्याजनी, हळदी कुंकू लेऊया हक्काच्या अंगणी आपली भारतीय संस्कृतीत हळदी कुंकवाला अनन्यसाध- ारण महत्त्व आहे, महिला यानिमित्ताने एकत्र येऊन प्रेमाची, मायेची, हितगुज करतात, शिवाय ज्ञानाची देवाण घेव- ाण करतात, मकर संक्रांत ते रथसप्तमी पर्यंत हळदी कुंकू कार्यक्रम घेतले जातात याचे औचित्य साधून आष्टीतील रेणुका माता मल्टीस्टेट शाखेत शुक्रवार दि १७ जानेवारी रोजी हळदी कुंकू कार्यक्रम प्रसंगी शाखेतील महिला कर्मचारी क- ोमल जगताप व प्रज्ञादेवी निकाळजे यांनी वान वाढून महीलांना संक्रातीच्या शुभेच्छा देऊन स्वागत केले.या कार्यक्रमा दरम्यान अनेक महिलांनी आपली मते मांडली व रेणुका माता मल्टीस्टेट शाखेचे आभार मानले. यावेळी रेणुका माता मल्टिस्टेटच्या सर्व ठेवी व कर्जाची माहिती व कॅलेंडर वाटप करण्यात आले व सर्व महिलांशी कर्मचारी यांनी संव- ाद साधला.कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून झुंजार नारी मंचच्या अध्यक्षा सौ मनीषा महेश चवरे, सौ.रेखा अविनाश कदम,सौ.ज्योती पवार, सौ.नम्रता मावसकर,सौ. निता काथवटे,सौ. गीतांजली गळगटे,सौ नम्रता टकले,सौ. राणी माळवदे आदी उपस्थित होत्या तसेच बँकेचे शाखाधिकारी,कर्मच- ारी तसेच संस्थेच्या सभासद, ग्राहक, हितचिंतक महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

## बीड रेल्वे स्थानक ला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या : वीर

जिल्ह्यातील जनतेसाठी अत्यंत महत्त्वाचे असणाऱ्या बीड रेल्वे प्रश्न मार्गी लागला असून येत्या काही दिवसात बीड रेल्वे स्थानकाचे उद्घाटन होणार असून होणाऱ्या उद्घाटनापूर्वीच बीड रेल्वे स्थानक ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी माजी सैनिक अनुरथ वीर हे जिल्हाधिकारी कार्यालय समोर गेल्या पाच दिवसापासून आमरण उपोषणास बसले आहे. त्यांच्या उपोषणाला जिल्ह्यातील सर्व पक्ष संघटनांनी पाठिंबा दर्शविला असून आता सर्वसामान्य जनतेकडून ही बीड रेल्वे स्थानकाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव देण्यात यावे अशी मागणी होत आहे असे की,बीड रेल्वे चालक या उद्घाटन सोहळा दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी शासनाने करण्याचे निश्चीत केले आहे तरी मी या अगोदर आमरण उपोषण दिनांक १०/१०/ २०२४ रोजी केलेले आहे. परंतु सदरील रेल्वे स्थानक डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक बीड असे नाव देण्यासाठी शासनाने व लोक प्रतिनिधीनी मला अश्वासन दिले होते.परंतु आज पर्यंत याबाबद कसलेही पत्र व्यवहार किंवा विश्वसात न घेता उद्घाटन करण्याचे निश्चित केले आहे. परंतु हे शासन स्तरावर अर्जपर्यंत यांनी नाव घोषीत केलेले नाही. तरी येत्या २६ जानेवारी बीड रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनापूर्वीच बीड रेल्वे स्थानकला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी आज पाचव्या दिवशी ही माजी सैनिक अनुरथ वीर ही आमरण उपोषणावर बसले असून त्यांची प्रकृती खाली दिलेली आहे. २६ जानेवारी पूर्वीचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव बीड रेल्वे स्थानकाला दिले गेले नाहीत तर आंबेडकर जनता रस्त्यावर उतरणार असल्याचे व उद्घाटन होऊ देणार नसल्याचा तीव्र भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.तरी जिल्हा प्रशासन कडून उपोषण कर्त्याचे दखल न घेतल्याने आज जिल्ह्यातील सर्व पक्ष संघटनांच्या लोकप्रतिनिधी कडून एक शिष्ट मंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आल

## १० वीच्या हॉल तिकीट वर ची जात आम्ही खपवून घेणार नाही. - संभाजी ब्रिगेड
## अन्यथा आम्हाला मुख्यमंत्री, शिक्षण मंत्र्यांची जात काढावी लागेल. - संतोष शिंदे

१० वीच्या परीक्षेतील हॉल तिकीट वर शिक्षण विभागाच्या वतीने जातीचा उल्लेख करण्यात येणार आहे. मुळात हे अत्यंत निषेधार्ह आहे. पुरोगामी महाराष्ट्रात जाणीवपूर्वक राज्याच्या कानाकोप-यात जातीजातीमध्ये सध्या प्रचंड वाद निर्माण केले जात आहेत. प्रत्येक गोष्टीत जातीवादी भूमिका घेतली जात आहे. सरकारच्या वतीने आता हॉल तिकीटवर जातीचा उल्लेख करून काय साध्य करणार? हॉल तिकीट वरची जात किती दिवस टिकणार? परीक्षेला कुठल्या जातीचा विद्यार्थी शेजारी आहे हे शिक्षण विभागांना विद्यार्थ्यामध्ये भांडण लावून काय साध्य करायचं? अशी असंख्य प्रश्न महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांसमोर उभे राहतील. गावात आमच्या मुलांना गुण्या गोविंदाने राहू द्या आणि जगू द्या. ज्या लहानपणापासूनच्या



बाल मित्राचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत कधीही जात विचारली जात नव्हती किंवा कळत नव्हती त्याच विद्यार्थ्यांना आता जाती- जातीमध्ये विभागण्यासाठी मशिक्षण विभागफ पुढाकार घेत असेल तर संभाजी ब्रिगेड हे खपवून घेणार नाही. राज्य सरकारने तात्काळ हा निर्णय मागे घ्यावा... अन्यथा, आम्हाला शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक, शिक्षण मंत्री, मुख्यमंत्री आणि सरकारची जात काढावी व विचारावी लागेल... शिक्षण विभागाने तात्काळ निर्णय मागे घ्यावा...यावेळी प्रदेश प्रवक्ता संतोष शिंदे, प्रदेश संघटक अतुल गायकवाड, मराठा सेवा संघाचे धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष जगदीश गवळी सर, संत नामदेव तुकाराम वारकरी परिषदेचे जिल्हाध्यक्ष बळीराम कवडे, बालाजी माळी, शेतकरी कामगार पक्षाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य भारत जाधव आदी उपस्थित होते.

- संतोष शिंदे,
प्रदेश प्रवक्ता संभाजी ब्रिगेड महाराष्ट्र

# स्वामित्व योजनेंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून सनद वितरणाचा शुभारंभ
# महाराष्ट्राचे राज्यपाल तसेच मुख्यमंत्री यांच्या हस्ते सनद वितरण

मुंबई, दि १८ : स्वामित्व योजनेद्वारे देशातील जनतेच्या उत्पन्नात वाढ होत असून यामुळे त्यांच्या आशा-आकांशा पुर्ण करत आहे. स्वामित्व योजनेंतर्गत जनतेला देण्यात आलेल्या कायदेशीर सनदेमुळे त्यांना मदत होत असून या सनदेच्या आधारे बँकेतून कर्जाद्वारे जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल, असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितले.केंद्रीय ग्रामविकास व पंचायत राज मंत्रालयामार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे स्वामित्व योजनेंतर्गत सनद वितरणाचा शुभारंभ करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सह्याद्री अतिथीगृह येथून ऑनलाईन उपस्थित होते. मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, भूमी अभिलेख जमाबंदी आयुक्त व संचालक डॉ.सुहास दिवसे, विभागीय आयुक्त राजेश देशमुख तसेच पालघर, रायगड, ठाणे जिल्ह्यातील लाभार्थी उपस्थित होते.देशातील गरीबी कमी करायची असेल तर प्रत्येक नागरिकांजवळ मालमत्तेचे अधिकार असणे गरजेचे आहे असे सांगून प्रधानमंत्री श्री.मोदी म्हणाले की, देशातील लाखभर लोकांकडे संपत्ती असूनही त्यास किंमत मिळत नव्हती. स्वतःचे घर असूनही काही लोक त्यावर कब्जा करत होते. २०१४ पासून आम्ही देशातील नागरिकांचे ड्रोन द्वारे सर्व्हेक्षण करून त्यांना प्रापर्टी कार्ड वितरित करत आहो. यामुळे लोकांचे जीवन बदलणार असल्याचे प्रधानमंत्री यांनी सांगितले. स्वामित्तव योजनेंतर्गत या प्रॉपर्टी कार्डमुळे देशातील भ्रष्टचार कमी होणार आहे. आज




९८ टक्के भूमी अभिलेखाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. आज गावोगावी शौचालये, उज्ज्वला गॅस, जलपुरवठा, आयुष्यमान, सडके, इंटरनेट, ब्रॉडबँड सोबत कॉमन सर्व्हीस सेंटर या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. शहरामध्ये मिळणा-या सुविधा आता गावात मिळत आहे. देशातील गरीब सशक्त झाला तरच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.प्रधानमंत्री स्वामित्व योजनेतून ग्रामीण भारताच्या सक्षमीकरणास चालना

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसप्रधानमंत्री स्वामित्व योजनेच्या पथदर्शी प्रकल्पात महाराष्ट्राचा समावेश होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ङ्गसबका साथ, सबका विकास, सबका विश्वासङ्ग असा दृष्टिकोन आहे. ग्रामीण भागाचा विकास हा देशाच्या प्रगतीचा आधार आहे, ही जाणीव ठेवूनच स्वामित्व योजना आखण्यात आली आहे. राज्यातील सुमारे ६० लाख हून अधिक कुटुंबांना या योजनेचा थेट फायदा होईल. ही योजना केवळ शासकीय उपक्रमापुरती मर्यादित नसून, ती ग्रामीण भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय प्रणालीत आमूलाग्र बदल घडविणारी आहे. ग्रामीण भागातील जमिनीच्या मालकीबाबतची अनिश्चितता आणि वाद कमी होणार आहेत. अनेकांना जमिनींचा कायदेशीर हक्क सिद्ध करणे कठीण जाते. यामुळे केवळ न्यायालयीन प्रकरणे वाढतात. अनेकदा विकास प्रक्रियादेखील थांबते. या समस्येचे स्वामित्व योजनेमुळे निराकरण होईल. या योजनेद्वारे गावांतील जमिनींची मोजणी अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाच्या मदतीने केली जाते आणि प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या मालकीच्या जमिनीचे कायदेशीर प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र केवळ मालकीचा पुरावा नसून, त्यामागे आर्थिक सक्षमीकरणाची मोठी संधी ठरेल, असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले.स्वामित्व योजनेंतर्गत राज्यपाल श्री.राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यातील विनोद आत्माराम पिंपळे, माया विकास पिंपळे, सदानंद वामन पिंपळे, दिलीप यशवंत सपाटे, प्रकाश शांताराम रावते, अलिबाग जिल्ह्यातील रोहण कृष्णा पाटे, शैलेश यशवंत ठाकूर, मिलिंद पांडुरंग पडते, प्रभाकर शांताराम नाईक, अंकुश सिताराम धाके आणि ठाणे जिल्ह्यातील विष्णू चुरू आंबेकर, यमुनाबाई रामचंद्र पाटील, मधुकर तुकाराम पाटील आणि चेतन गजानन पाटील यांना सनद वाटप करण्यात आले.बीड येथील कार्यक्रमकार्यक्रमाची प्रस्तावना करताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती जिल्ह्यात स्वामित्व योजनेंतर्गत झालेल्या काम काजाचा लेखाजोखा जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी सादर केला.यानंतर स्वामित्व योजनेची सविस्तर माहिती देणारी लघुचित्रफीत सभागृहात दाखविण्यात आली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकारी कर्मचा-यांनी अथक परिश्रम घेतले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

लोकआरंभ

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

रविवार १९ जानेवारी २०२५

https://lokaarambh.com




## प्रताप देशमुख यांनी केला शिबिरात नवसंकल्प

परभणी/प्रतिनिधी संपूर्ण महानगरात भक्कम अशा पक्ष संघटनात्मक बांधणीसह आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत जून्या आणि नवीन कार्यकर्त्यांच्या बळावर यश प्राप्तीचा संकल्प राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष तथा प्रथम महापौर प्रताप देशमुख यांनी शिर्डी येथील पक्षाच्या नव संकल्प शिबिरातून व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शिर्डीत दोन दिवशीय नव संकल्प शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबीरात शहरासह जिल्ह्यातील पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते. या शिबीरात पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष तथा प्रथम महापौर प्रताप देशमुख यांनी श्रेष्ठींसह वरिष्ठ नेतेमंडळींसमोर आपल्या भाषणातून काही संकल्प जाहीर केले. विशेषतः परभणी महानगरांतर्गत राष्ट्रवादीच्या संघटनात्मक बांधणीचा संकल्प सोडला. जून्या नेतेमंडळींसह कार्यकर्त्यांबरोबर काही नवीन पिढीतील सक्षम असे युवक व महिला कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश करीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत मोठे यश पटकाविण्याचाही संकल्प व्यक्त केला. त्या दृष्टीने आपल्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते निश्चितच येत्या काळात प्रयत्नांची पराकाष्टा करतील, असे ते म्हणाले. दरम्यान, या शिबराचा शुभारंभ पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राज्यसभा खासदार श्रीमती सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते, मंत्रीमहोदय, आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# अंगावर झाडाची पानं, पांघरलेलं गवत या परिसरात लपलेला आरोपी, कशी केली अटक?




बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर झालेल्या चाकू हल्ल्याप्रकरणी मुख्य आरोपीला अखेर अटक करण्यात आली आहे. मोहम्मद अलियान उर्फ विजय दास असे या आरोपीचे नाव असल्याची माहिती समोर आली आहे. विजय दास याला ठाण्यातून ताब्यात घेण्यात आले आहे. तो पश्चिम बंगालच्या नदिया जिल्ह्यातील रहिवाशी आहे. सैफ अली खानवर हल्ला करणा-या आरोपीला कशी अटक करण्यात आली, पोलिसांनी कसा सापळा रचला याची माहिती समोर आली आहे.मुंबई पोलिसांनी सैफ अली खानवर चाकू हल्ला करणा-या मुख्य आरोपीला ठाण्यातून अटक केली आहे. ठाण्यातील कासारवडवली भागातून मध्यरात्री ३ च्या सुमारास ही अटक करण्यात आली आहे. आरोपी विजय दासला ठाण्याच्या लेबर कॅम्पजवळील जंगलातून बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. ठाण्यातील हिरानंदानी इस्टेट येथील टीसीएस कॉल सेंटरच्या मागे मेट्रो कन्स्ट्रक्शन साईटजवळ हे लेबर कॅम्प आहे. तब्बल २०० पोलिसांच्या पथकाने सापळा रचत मुख्य आरोपीला अटक केली आहे.

**लेबर कॅम्पजवळील जंगलात कोंबिंग ऑपरेशन**

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून हा आरोपी शर्ट बदलत पोलिसांना चकवा देत होता. पोलिसांकडून सातत्याने त्याचे लोकेशन ट्रेस केले जात होते. अखेर काल रात्री ठाण्यातील लेबर कॅम्प भागात त्याचे लोकेशन असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर पोलिसांनी लेबर कॅम्पजवळील जंगलाच्या परिसरात कोंबिंग ऑपरेशन केले. यावेळी आरोपीने लपण्यासाठी अंगावर झाडाची पानं आणि गवत पांघरलं होतं. अखेर वांद्रे पोलीस, मुंबई गुन्हे शाखा आणि ठाणे पोलीस यांच्या संयुक्त कारवाईतून त्याला अटक करण्यात आली आहे.

**आरोपीकडून गुन्ह्याची कबुली**

मोहम्मद अलियान उर्फ विजय दास याला अटक केल्यानंतर त्याने सैफ अली खानवर चाकू हल्ला केल्याची कबुली दिली आहे. यानंतर त्याला मध्यरात्री चेंबूर पोलीस ठाण्यात आणण्यात आले होते. यावेळी मुंबई पोलीस आणि क्राईम ब्रांचच्या टीमकडून आरोपीची चौकशी करण्यात आली. चेंबूरनंतर आरोपीला पहाटे ४ वाजता खार पोलिसांत आणण्यात आले. गेल्या दोन दिवसांपासून ही शोध मोहिम सुरु होती. अखेर दोन दिवसांच्या शोध मोहिमेनंतर पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

## आ.प्रकाश सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त जुबेर मोमीन यांच्यातर्फे जिल्हा परिषद शाळा व महाराष्ट्र कॉटन प्रेसिंग येथे लाखो रुपयाच्या पाणी फिल्टर व पाणी प्लांट ची सोय उपलब्ध



माजलगाव । तालुक्यातील पात्रुड येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ व फिल्टर पाणी मिळावे अशी अपेक्षा विद्यार्थी पालक व शिक्षक यांची असल्याने आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त औचित्य साधून महाराष्ट्र कॉटन जिनिंगचे मालक जुबेर मोमीन यांनी स्वखर्चेतून दिले आहे महाराष्ट्र कॉटन प्रेसिंग जिनिंग येथे पंचक्रोशीतील कापूस विक्रेते येत असल्याने त्यांनाही पाण्याची सोय व्हावी म्हणून त्याही ठिकाणी मोठा पाण्याचा प्लांट उभारण्यात आला आहे. आमदार प्रकाश सोळंके यांच्या वाढदिवसाचे निमित्त आपण लोकांसाठी काही देण लागतो या हेतूने मोमीन जुबेर यांनी जिल्हा परिषद शाळा पात्रुड व महाराष्ट्र कॉटन जिनिंग येथे पाच लक्ष रुपयांचे पाणी फिल्टर मोफत उपलब्ध करून दिल्याने ग्रामस्थ आनंदाचे वातावरण निर्माण झालेगेले आहे. या पाणी फिल्टर प्लांटचे उद्घाटन व लोकार्पण सोहळा जयसिंग भैया सोळंके ( माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती ) यांच्या हस्ते आज करण्यात आले यावेळी एकनाथ मस्के, लतीफ मोमीन, घनश्याम भुतडा, इसाभाई मोमीन, अरुण जंगले, भानुदास भुजब आज-काल धावपळीच्या युगात रात्री शांत झोप न येणे ही एक कॉमन समस्या झालेली आहे का? रात्री शांत झोप येणे ही सर्व वयोगटातील समस्या आहे का? ज्या

## आदिती तटकरे की भरत गोगावले? पालकमंत्रिपद कुणाकडे?




राज्याच्या राजकीय वर्तुळातून या क्षणाची मोठी बातमी समोर आली आहे. राज्य सरकारकडून अखेर पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. सत्ता स्थापनेनंतर गेल्या अनेक दिवसांपासून पालकमंत्रिपदासाठी जोरदार रस्सीखेच पाहायला मिळत होती. मात्र आता अखेर ही यादी जाहीर झाली आहे. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरुन राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध शिवसेना असा थेट सामना होता. राष्ट्रवादीच्या महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे आणि शिवसेनेचे मंत्री भरतशेठ गोगावले यांच्यात थेट स्पर्धा होती. भरतशेठ यांनी अनेकदा पालकमंत्रिपदावर दावा ठोकला होता. मात्र अखेर आदिती तटकरे यांनी बाजी मारली आहे. आदिती तटकरे या रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री असणार आहेत.जवळपास २ महिन्यांनंतर यादीराज्यात महायुतीचं २३ नोव्हेंबर रोजी सरकार आलं. राज्यातील जनतेने महायुतीला एकहाती सत्ता मिळवून दिली. त्यानंतर राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाचा ५ डिसेंबर रोजी नागपुरात शपथविधी पार पडला. मंत्र्यांनी पदभार स्वीकारला. मात्र कुणाला कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्रिपद द्यायचं? हे निश्चित होत नव्हतं. अखेर हा तिढा सुटलाय. आता १८ जानेवारीला पालकमंत्र्यांची यादी जाहीर झालीय.आदिती तटकरे यांनी रायफाडफ राखलाभरतशेठ गोगावले रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी आग्रही होते. भरतशेठ गोगावले यांनी एकदा पालकमंत्रिपदावरुन बोलताना अजब वक्तव्य केलं होतं. ङ्गआदिती तटकरे यांनी पालकमंत्री म्हणून चांगलं काम केलं असलं तरी मी त्यांच्यापेक्षा मी चांगलं काम करून दाखवेन. शेवटी महिला आणि पुरुषात काही फरक आहे की नाही?ङ्ग असं अजब वक्तव्य गोगावले यांनी केलं होतं. यावरुन चांगलाच वादही रंगला होता.



## मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पात ठाण्यातील समुद्राखालील बोगद्याची रेल्वेमंत्रीकडून पाहणी, प्रथमच आले फोटो

मुंबई-अहमदाबाद दरम्यान ५०८.०९ किलोमीटर बुलेट ट्रेन प्रकल्पात ठाण्यातील समुद्राखालील बोगद्याचे काम वेगाने सुरु आहे. या कामाची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पाहणी केली. २१ किलोमीटर लांबीच्या समुद्राखालील बोगद्यातून २५० किमी वेगाने बुलेट ट्रेन सुसाट धावणार आहे.

## परभणीच्या पालकमंत्रीपदी मेघना साकोरे- बोर्डीकर

मुंबई : महाराष्ट्र राज्याचे मंत्री आणि राज्यमंत्री यांची जिल्हा पालकमंत्री तसेच सह पालकमंत्री म्हणून सामान्य प्रशासन विभागाने नियुक्ती केली आहे. यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद असणार आहे तर ड.आशिष जयस्वाल यांच्याकडे सहपालकमंत्रीपद सोपविण्यात आले आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबई शहर आणि ठाणे या दोन जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे आणि बीड या दोन जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद देण्यात आले आहे. परभणीच्या पालकमंत्रीपदी मेघना साकोरे बोर्डीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खूप वर्षानंतर परभणी जिल्ह्याला पालकमंत्री लाभल्याने जिल्ह्यातील जनतेच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. उर्वरित जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाची व सहपालकमंत्री पदाची जबाबदारी पुढीलप्रमाणे : नागपूर व अमरावती : चंद्रशेखर बावनकुळे, अहिल्यानगर : राधाकृष्ण विखे-पाटील, वाशीम : हसन मुश्रीफ, सांगली : चंद्रकांत पाटील, नाशिक : गिरीश महाजन, पालघर : गणेश नाईक, जळगाव : गुलाबराव पाटील, यवतमाळ : संजय राठोड, मुंबई उपनगर : ड.आशिष शेलार तर सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, रत्नागिरी : उदय सामंत, धुळे : जयकुमार रावल, जालना : श्रीमती पंकजा मुंडे, नांदेड : अतुल सावे, चंद्रपूर : डॉ.अशोक उईके, सातारा : शंभूराज देसाई, रायगड : कु.आदिती तटकरे, लातूर : शिवेंद्रसिंह भोसले, नंदुरबार : ड.माणिकराव कोकाटे, सोलापूर : जयकुमार गोरे, हिंगोली : नरहरी झिरवाळ, भंडारा : संजय सावकारे, छत्रपती संभाजीनगर : संजय शिरसाट, धाराशिव : प्रताप सरनाईक, बुलढाणा : मकरंद जाधव (पाटील), सिंधुदुर्ग : नितेश राणे, अकोला : आकाश फुंडकर, गोंदिया : बाबासाहेब पाटील, कोल्हापूर : प्रकाश आबिटकर तर सहपालकमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ, वर्धा : डॉ.पंकज भोयर आणि परभणी : श्रीमती मेघना बोर्डीकर

## बलात्कार प्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षा द्या- किनवट येथे आदिवासी समाजाचा जन आक्रोश मोर्चात मागणी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : नोकरी लावुन देतो असे आमिष दाखवित दि.१३-जानेवारी रोजी आदिवासी युवती सोबत येथिल आरोग्य सेवकाने व इतर तिन नराधमाने दराटी परिसरातील अभयारण्यात नेऊन बलात्कार केल्याच्या घटनेच्या निषेधार्थ किनवट येथे आदिवासी जनजाती समाजाने आक्रोष मोर्चा दि.१८-जानेवारी रोजी काढण्यात आला.सदर मोर्चा शहरातील हुतात्मा गोंडराजे मैदान ते उपविभागीय अधिकारी कार्यालय असा मोर्चा असंख्य महिला व नागरिकांच्या उपस्थितीत काढण्यात आला. १३- जानेवारी रोजी घडलेल्या निषेधार्थ किनवट येथे आदिवासी जनजाती समाजाच्या वतीने जनआक्रोश मोर्चा दुपारी १ वाजता काढण्यात आला.यावेळी किनवट शहर व गोकुंदा शहर व्यापारपेठ कडकडीत व्यापा-यांनी स्वयंस्पुर्द बंद ठेवण्यात आले तर मोर्चा शांततेत संपन्न झाला. अत्याचार करणा-या नराधमास फाशीची शिक्षा द्या असे नारे लावत आक्रोश मोर्चा हा गोंडराजे मैदान येथून डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अन्नाभाऊ साठे, अहिल्याबाई होळकर,महात्मा फुले,छत्रपती शिवाजी महाराज,राष्ट्रमाता जिजाऊ,व बिरसामुंडा सर्व महापुरूषांना अभिवादन व पुष्पहार अर्पण करत मोर्चा थेट उपविभागीय




कार्यालय येथे असंख्य महिला व जनतेच्या उपस्थितीमध्ये पोहचला आदिवासी समाज बांधव, युवती, युवक व महिलांचा व इतर समाजांचा ही आक्रोश मोर्चामध्ये समावेश होता.मोर्चाचे रुपांतर जाहीर सभेत झाले यावेळी मंचावर आदिवासी नेते डॉ. आरती ताई फुपाटे,नीलिमा ताई पट्टे, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, के मुर्ती, प्रा .किशन मिरासे, संतोष मरस्कोले ,बुलबुले ,बोंबले,संजय सिडाम, अनिरुद्ध केंद्रे,प्रशांत कुलकर्णी, संतोष रायेवार,सुभाष वानोळे,रामेश्वर पराचे,दत्ता आडे,शशांक कनाके, सह अनेक नागरिकांची उपस्थिती होती.तर कार्यक्रमाला यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी तुकाराम पेंदोर,विश्वनाथ नखाते ,रामकिशन टारपे,अनिल कनाके,मंगा गुडी सरपंच सूर्यभान किनाके, यांच्यासह आदिवासी जनजाती समाजाचा सहभाग होता.सभेमध्ये बोलतांना प्रवक्त्या डॉ आरती ताई म्हणाले कि, आदिवासी महिलांनी स्वतःची शक्ती ओळखली पाहिजे व अशा नराधमाच्या आमिषांना बळी पडु नये तर मजबुत होऊन संघर्ष दिला पाहीजे तर विदर्भ प्रांत अध्यक्ष निलिमा ताई पट्टे यांनी देखिल आदिवासींवर होत झालेल्या विविध अत्याचारांच्या घटनां बद्दल चिंता व्यक्त केली तर अशा घटना होऊ नये या करिता शासनाने तत्काळ उपाययोजना करावी अशी मागणी केली. सभेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.उत्तम धुमाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन नामदेव कातले यांनी केले.सभा संपल्या नंतर आदिवासी महिला नेत्या व बांधवांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे निवेदन नायब तहसिलदार रामेश्वर मुंडे यांना दिले निवेदनावर सुर्यभान किनाके, डॉ उत्तम धुमाळे, तुकाराम पेंदोर, रामकिशन टारपे, विश्वनाथ नखाते, अनिरुध्द केंद्रे, मारोती आडे, प्रा. किशन मिरासे, गोपिनाथ बुलबुले, प्रशांत कुलकर्णी, डॉ सुभाष वानोळे, रामेश्वर परचे, संजय सिडाम, शशांक कनाके, दत्ता आडे, संतोष म्हरसकोल्हे, आनंद मच्छेवार, सुरेश साकपेल्लीवार, जितेंद्र कुलसंगे, संतोष कनाके यांच्या सह अनेकांच्या स्वाक्ष-या आहेत.


This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com